follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

सातारा दि. २५ मे २०२४

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २५६ * सातारा * सातारा बुधवार दि. २९ मे २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# राजकोट अग्नितांडव ! गेम झोनच्या मालकाचाही जळून मृत्यू



## आईच्या DNA मुळे पटली ओळख

**मुंबई** : . गुजरातमधील राजकोट येथे टीआरपी गेम झोनमध्ये २५ मे रोजी संध्याकाळी झालेल्या भीषण अग्नितांडवामध्ये ९ मुलांसह २८ जणांचा होरपळून मृत्यू झाला होता. आग इतकी भीषण होती की, अनेकांचा जळून कोळसा झाला, त्यांची ओळखही पटवणे अवघड झाले होते. DNA चाचणीच्या मदतीने अनेकांची ओळख पटवण्यात आले. विशेष म्हणजे, या मृतांमध्ये गेम झोनच्या मालकाचाही समावेश आहे.

या आगीत गेम झोनचे मालक प्रकाश हिरण यांचाही दुर्दैवी मृत्य ूझाला. त्यांच्या अवशेषांचे DNA नमुने आईशी जुळल्यामुळे त्यांची ओळख पटली. आग लागली त्यावेळी प्रकाश हिरण हे देखील सीसीटीव्हीत कैद झाले होते.

आगीच्या घटनेनंतर त्यांचा कुटुंबाशी संपर्क झाला नव्हता, सर्व फोन नंबरही बंद होते. यानंतर प्रकाश यांचा भाऊ जितेंद्रने पोलिसांकडे डीएनए चाचणीसाठी निवेदन दिले होते. उच्च न्यायालयाने प्रशासनाला फटकारले

टीआरपी गेमिंग झोनमध्ये लागलेल्या भीषण आगीप्रकरणी गुजरात उच्च न्यायालयाने स्थानिक प्रशासन आणि राज्य सरकारला कठोर शब्दांमध्ये फटकारले. एवढ्या वर्षांपासून विना एनओसी हा प्रकार सुरू होता, अधिकारी झोपले होते का? आमचा स्थानिक प्रशासन आणि राज्य सरकारवर विश्वास नाही. तुम्ही आंधळे झाले होते, अशा शब्दांमध्ये न्यायालयाने सरकारला सुनावले आहे. आगीच्या घटनेची उच्च न्यायालयाने स्वत:हून दखल घेत प्रकरण दाखल करून घेतले होते, त्यावर सोमवारी सुनावणी झाली. **कशामुळे लागली आग ?** गेमिंग झोनमधील एक सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. त्यात दिसते की, पहिल्या मजल्यावर एका ठिकाणी वेल्डिंगचे काम सुरू होते. त्याच्या खाली फोम शीट, प्लास्टिकचे साहित्य आणि मोठ्या प्रमाणात थर्माकोलच्या शीट व इतर साहित्य ठेवले होते. त्यावर वेल्डिंगच्या ठिणग्या पडल्या आणि त्यामुळे आग लागली. कर्मचाऱ्यांना आग विझविण्यात अपयश आले. अवघ्या दोन-तीन मिनिटांमध्येच आगीने रौद्ररुप धारण केले.

## उत्तर कोरियाच्या हेरगिरी उपग्रहाचं प्रक्षेपण अपयशी, उड्डाण करताच काही सेकंदात उडाल्या रॉकेटच्या ठिकऱ्या



अंतराळातून लष्करी हेरगिरी करण्याच्या उत्तर कोरियाचा हुकूमशाह किम जोंग उन याच्या प्रयत्नांना मोठा धक्का बसला आहे. सोमवारी उत्तर कोरियाने एक लष्करी हेरगिरी उपग्रह प्रक्षेपण करण्याचा केलेला प्रयत्न अपयशी ठरला.

उत्तर कोरियाच्या हेरगिरी उपग्रहाचं प्रक्षेपण अपयशी, उड्डाण करताच काही सेकंदात उडाल्या रॉकेटच्या ठिकऱ्याअंतराळातून लष्करी हेरगिरी करण्याच्याउत्तर कोरियाचा हुकूमशाह किम जोंग उन याच्या प्रयत्नांना मोठा धक्का बसला आहे. सोमवारीउत्तर कोरियानेएक लष्करी हेरगिरी उपग्रह प्रक्षेपण करण्याचा केलेला प्रयत्न अपयशी ठरला असून, प्रक्षेपण केल्यानंतर काही काळातच उपग्रह घेऊन जाणाऱ्या रॉकेटच्या ठिकऱ्या उडाल्या.

जर उत्तर कोरिया या उपग्रह प्रक्षेपणात यशस्वी ठरला असता तर अंतराळात आपल्या दुसरा हेरगिरी उपग्रह तैनात करण्यात त्याला यश आले असते.

मात्र लष्करीदृष्ट्या सक्षम होत असलेल्या उत्तर कोरियाला या अपयशामुळे मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागले आहे.त्याचं कारण म्हणजे मागच्या वर्षी या उपग्रहाच्या प्रक्षेपणाचे दोन प्रयत्न अपयशी ठरले होते. यावेळीही प्रक्षेपण केल्यानंतर उपग्रह घेऊन जाणारं रॉकेट अवघ्या ३० सेकंदांमध्येच फुटले.मात्र असं असलं तरी उत्तर कोरियाने मागच्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात आपला पहिला हेरगिरी उपग्रह अंतराळात तैनात करण्यात यश मिळवले होते. उत्तर कोरियाच्या नॅशनल एअरोस्पेस टेक्नॉलॉजीने सांगितले की, नव्या उपग्रहाला घेऊन जाणाऱ्या रॉकेटमध्ये स्फोट झाला.रॉकेट हवेत असताना याची पहिली स्टेज पूर्णपणे कार्यरत होऊ शकली नाही.

अखेरीस हे रॉकेट हवेतच फुटले.प्राथमिक तपास अहवालामधून उत्तर कोरियाचे उपग्रह घेऊन जाणारं रॉकेट हे त्याच्या स्वदेशी लिक्विड फ्युएल रॉकेट मोटारीमध्ये बिघाड झाल्याने कोसल्याची माहिती समोर आली आहे. तसेच या अपघातामागची इतर कारणांचाही शोध घेतला जात आहे. दरम्यान, प्रक्षेपणादरम्यान उत्तर कोरियाचं रॉकेट कोसळल्याची माहिती सर्वप्रथम दक्षिण कोरिया आणि जपानने जगाला दिली.

# डोंबिवली स्फोटाप्रकरणी उच्चस्तरीय समिती गठीत

## तीन आठवडयात अहवाल सादर करणार

**मुंबई** : डोंबिवली येथे एमआयडीसीतील स्फोटाप्रकरणी राज्याचे प्रधान सचिव उद्योग, प्रधान सचिव कामगार आणि प्रधान सचिव पर्यावरण यांची उच्च स्तरीय समिती नेमली आहे. ही समिती तीन आठवड्यात अहवाल सादर करणार आहेत. ए बी सी क्षेणी च्या इंडस्ट्रीचा आढावा घेणार आहेत. ज्या कंपनीने नियमांचे उल्लंघन केले आहे किंवा अनधिकृत बांधकाम केले असेल या सगळ्या बाबींचा सुद्धा आढावा घेतला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीला भेट दिली त्यावेळी त्यांनी काही निर्देश दिले आहेत त्याचे तंतोतंत पालन या समितीकडून आणि संबंधित अधिकारी यांच्याकडून केले जाणार आहे. अशी माहिती महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. मंत्रालयात या संबंधित आढावा बैठक घेतली होती.

सामंत पुढे म्हणाले की दोन वर्षापूर्वी एम आय डी सी आणि त्यातील केमिकल कंपन्यांचे स्थलांतरण करण्याचा निर्णय झाला होता. २०२२ मध्ये ठराव देखील झाला होता. मागील एक वर्षापासून पातळ गंगा, जांभवली येथे जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया देखील सुरू करण्यात आलेली आहे. परंतु आचारसंहितेमुळे ते थांबले होते आता आम्ही निवडणूक आयोगाला पत्र लिहून विनंती करणार आहोत की उद्योजकांना जागा वाटप करण्याची परवानगी द्यावी आणि त्यासाठी प्रक्रिया सुरू करावी, असा निर्णय आज बैठकीत झाला आहे.

गेल कंपनी गेल्याचे खापर सरकारवर फोडू नये

उदय सामंत पुढे म्हणाले की काही दिवसांपूर्वी विरोधी पक्षनेते यांनी आरोप केला की गेल कंपनी महाराष्ट्रातून निघून गेली त्याला सरकार जबाबदार आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की गेल कंपनी गेली त्याचे खापर आमच्यावर फोडू नये. गेल कंपनीने महाराष्ट्र सरकार कडे परिपूर्ण प्रस्ताव दिलाच नव्हता. त्यांनी रत्नागिरी मध्ये जागा मागितली होती त्यावेळेस एम आय डी सी कडे तिकडे जागा उपलब्ध नव्हती. जेव्हा उपलब्ध झाली तेव्हा त्यांनी आमच्या अधिकाऱ्यांना सरळ सांगितले की रिफायनरी साठी मागे दोन वेळा जे झाले, आंदोलने झाली, राजकीय दबाव टाकला. रिफायनरी पाहिजे की नाही हे नीट सांगितले नाही त्यामुळे त्यांनी पुढे प्रस्ताव दिलाच नाही.


ते पुढे म्हणाले की राज्य सरकारने स्थानिक पातळीवरील कंपन्या, जिल्हास्तरीय कंपन्या यासाठी शुरिपीळेप आणि गुंतवणुकीसाठी योजना आखली होती. त्यामुळे छत्रपती संभाजी नगर ५६८ कोटी, नाशिक ९७५ कोटी, अमरावती २२९ कोटी, नागपूर १५९ कोटी, पुणे ३०५ कोटी, कोकण ४१६ कोटी म्हणजे एकूण २६५२ कोटींचे एमओयू झाले आणि गुंतवणूक छत्रपती संभाजी नगर १०३०७ कोटी, नाशिक २१७३३ कोटी, अमरावती ३७४६ कोटी, नागपूर १७८४८ कोटी, पुणे २१८०६ कोटी आणि कोकण २१५४९ कोटी म्हणजेच एकूण गुंतवणूक ९६६८१ कोटी एवढी झाली आणि त्यामुळे २३१३३० रोजगार निर्मिती झालेली आहे.

तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेमुळे २०१९-२०२० मध्ये १२२० उद्योजक तयार झाले. २०-२१ मध्ये ४८१२ उद्योजक, २१-२२ मध्ये ४०९३ उद्योजक, २२- २३ मध्ये १२३३६ उद्योजक आणि यावर्षी १९८०० उद्योजक म्हणजेच दोन वर्षात ३१००० उद्योजक तयार झाले आहेत. याचाच अर्थ मुखमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून ९०००० रोजगार निर्माण झाले आणि जिल्हास्तरीय २ लाख रोजगार निर्माण झालेले आहेत. त्यामुळे विरोधकांनी आकडेवारी व पेपर्स बघावे उगीच राजकारण करू नये. मॅग्नेटीक महाराष्ट्र एक मोठा कार्यक्रम आपण ऑगस्ट किंवा सप्टेंबर मध्ये करतोय त्यातूनही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक येईल आणि त्यामुळे मोठी रोजगार निर्मिती होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.

### स्फोटात १३ कोटीचे नुकसान

**डोंबिवली स्फोटामध्ये सुमारे १३ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. वाणिज्य नुकसान १२ कोटी आणि रहिवासी नुकसान १ कोटी ६६ लाख आहे. हे सर्व नुकसान भरून काढण्यासाठी महाराष्ट्र सरकार सकारात्मक आहे. मृत व्यक्ती आणि गंभीर दुखापत होऊन ऍडमिट आहेत त्यांचा ही खर्च सरकार करणार आहे. सगळ्यांना मदत करणार आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत आधीच सूचना दिल्या आहेत. ज्या कंपन्यांचे इन्शुरन्स आहे त्यांना सध्या तरी मदत करण्याची गरज वाटत नाही. भविष्यात महाराष्ट्रातील एम आय डी सी आणि केमिकल झोन मधील कंपनी यांचे स्थलांतरण करण्याचा प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठीचे पावले सरकार उचलत आहेत. ज्या कंपन्यांनी नियमाचे पालन केले नाही. नियमांचे उल्लंघन केले आहे त्यांना त्या संदर्भातील नोटीस दिल्या गेल्या आहेत. या कंपन्या स्थलांतरण करताना त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी राज्य सरकार घेणार आहे.**

## मुंबई शिक्षक मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिवाजीराव नलावडे यांना उमेदवारी



**मुंबई** : मुंबई शिक्षक मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने शिवाजीराव नलावडे यांची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आज जाहीर केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, मुंबई विभागीय अध्यक्ष समीर भुजबळ या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या संसदीय मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार आज मुंबई कार्याध्यक्ष शिवाजीराव नलावडे यांच्या नावाची अधिकृत उमेदवार म्हणून घोषणा करण्यात आली.

शिवाजीराव नलावडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक आणि मुंबई जिल्हाध्यक्ष राहिले असून मुंबई बँकेचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक म्हणून ते सध्या कार्यरत आहेत. त्यांचे सहकार चळवळीतही योगदान मोलाचे आहे.

# कोस्टल रोडच्या गळतीची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

## आदित्य ठाकरेंचा सरकावर निशाणा !

**मुंबई** : कोस्टल रोड सुरू होऊन अवघे दोन महिने उलटत नाहीत तोच त्याला गळती लागल्याने आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उच्चस्तरीय अधिका-यांसह कोस्टल रोडची पाहणी केली. कोस्टल रोडच्या गळतीवर कायमस्वरूपी सोल्यूशन काढलं जाईल.कोस्टल रोडला काही ठिकाणी जॉइंट लीकेज आहेत मात्र स्कॉटलंडच्या जॉन यांची भेट घेतल्यानंतर मुख्य मार्गाला कोणताही धोका नसल्याचं महटलं आहे कोस्टल रोडवर २५ जॉइंट आहेत त्याठिकाणी इंजेक्शनद्वारे पॉलिमर जॉइंट केले जातील विशिष्ट टेक्नॉलॉजीने काम केलं जाईल असं त्यांनी म्हटंल आहे. दरम्यान याच मुद्द्यावरून शिवसेना ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर कोस्टल रोडच्या विलंबाचा तपास केला जाईल, असा इशाराच ठाकरेंकडून देण्यात आला आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, रहदारीला कोणतीही बाधा नाही. घाटात मोठे टनेलमध्ये पण पाणी येत मात्र कोस्टलचं पाणी थांबवण्यासाठी काम केलं जाईल. पावसाळात पाणी येणार नाही अशी खात्री आहे. तसंच दुसरी लेन १० जूनपर्यंत सुरू होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

आदित्य ठाकरे यांनी एक्सवरून शिंदे सरकारला लक्ष्य केलं. मविआचे सरकार कायम राहिले असते तर, मुंबई कोस्टल रोड डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्णपणे तयार झालेला असता. तसेच नागरिकांसाठी खुला झाला असता. पण भ्रष्ट राजवटीने आमचे सरकार पाडल्यानंतर त्या कामाचा वेग मुद्दाम कमी केला आणि खर्च वाढवण्याचे काम केले, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

तसेच, फेब्रुवारीमध्ये अनेकवेळा उद्घाटनाच्या तारखा बदलत राहिल्या, त्यावेळेस मी ते निदर्शनासही आणले होते. उद्धघाटन फक्त एका लेनसाठी सुरू होते. शेवटी आम्ही केलेल्या कामाचे श्रेय लाटण्यासाठी निवडणुकीपूर्वी घाईघाईत एक लेन उघडण्यात आली. एक लेन, जी सकाळी आठ ते संध्याकाळी सहा पर्यंतच खुली असते.

मग आम्हाला नवीन टाइमलाइन देण्यात आली. आधी मार्च, नंतर एप्रिल, नंतर मे पर्यंत संपूर्ण रस्ता खुला केला जाईल. आता जवळपास जून आलाय. मुंबई महापालिका नागरिकांना कोस्टल रोड उघडण्याच्या अंतिम तारखेबद्दल अधिकृत अपडेट देईल का? असा प्रश्न या पोस्टच्या माध्यमातून आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. शिवाय, जेव्हा आम्ही सरकार स्थापन करू तेव्हा हा विलंब का झाला ह्याची तपशीलवार चौकशी करूच, असा इशाराच मविआचे आमदार आदित्य ठाकरे यांच्याकडून देण्यात आला आहे.

# राज्यात मनुस्मृतीचा अभ्यासक्रमात सहभाग होऊ देणार नाही : छगन भुजबळ

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांची असून राज्य सरकारमध्ये सहभागी आहे. त्यामुळे राज्यातील शालेय शिक्षणांमध्ये मनुस्मृतीचा समावेश हा कदापी सहन करणार नाही. जोपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सत्तेत आहे तोपर्यंत मनुस्मृती ही शाळांमध्ये शिकवू देणार नाही. असे ठाम मत राज्याचे मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आढावा बैठकीमध्ये ते बोलत होते.




हा महाराष्ट्र ज्या महापुरुषांनी घडवला त्या महापुरुषांची शिकवण लहान मुलांना देणे गरजेचे आहे. जे कां रंजले गांजले । त्यासि ह्मणे जो आपुले ।। तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।। असा उपदेश देणार तुकाराम महाराज असतील किंवा अवघे विश्वची माझे घर असे शिकविणारे संत ज्ञानेश्वर महाराज असतील.

'धर्म, राज्य, भेद हे मानवा नसावे, सत्याने वर्तावे इशासाठी' असे शिकवण देणारे महात्मा फुले असतील किंवा पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे ! असं ठणकावून सांगणारे अण्णाभाऊ साठे यांची शिकवण मुलांना दिली गेली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले

यावेळी ते म्हणाले की, लोकसभा निवडणुकीमध्ये ४०० पार हा नारा दिल्यानंतर देशांमध्ये संविधान बदलले जाणार असा प्रचार विरोधकांनी केला आणि त्यामुळेच अनेक ठिकाणी दलित वर्ग नाराज झाल्याचे आपल्याला पाहायला मिळाले. ही चर्चा कुठे शांत होत नाही तर लगेच मनुस्मृतीच्या चर्चा सुरू व्हायला लागल्या आहेत. त्यामुळे आगामी काळात याचा देखील फटका आपल्याला बसु शकतो याचा विचार आपण करायला हवा.

नुकत्याच राज्यात लोकसभा निवडणुका होऊन गेल्या आता आगामी काळात विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुका होणार आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आचारसंहिता लागेल या काळामध्ये सर्व आमदारांच्या मतदारसंघातील कामे खोळंबता कामा नये यासाठी आपण अगोदरच निवडणूक आयोगाला पत्रव्यवहार करावा असेही भुजबळ म्हणाले.

विधानसभेला योग्य वाटा मिळायला हवा

लोकसभा निवडणुकीत २०१९ ला निवडून आलेल्या जागांचा निकष आमच्यासाठी लावण्यात आला. आता विधानसभेला लोकसभेसारखी जागावाटपाची खटपट होता कामा नये. यासाठी आताच भाजपाला त्यांनी ८०-९० जागा देण्याचा शब्द दिलेला त्याची आठवण करून द्या, अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली. आपण महायुतीमध्ये आलो तेव्हा भाजपाने शब्द दिलेला. विधानसभेला महायुतीमध्ये योग्य वाटा मिळायला हवा. आम्हाला एवढ्या जागा हव्यात हे त्यांना सांगावे लागेल. जर ८०-९० जागा मिळाल्या तर ५०-६० निवडून येतील. आता ५० आहेत म्हणजे आम्ही ५० जागा घेऊ असे होणार नाही. आताच सांगून टाका आमचा वाटा आम्हाला मिळाला पाहिजे म्हणून अशी मागणी भुजबळ यांनी केली. भुजबळ यांनी अजित पवारांकडे केली आहे

## संपादकीय

# पाणी टंचाई



राज्य सरकारने चाळीस तालुक्यांत दुष्काळ आणि ९५९ महसुली मंडळांत दुष्काळ सदृश परिस्थिती पाच महिन्यांपूर्वी जाहीर केली आहे. तत्पूर्वी, केंद्र सरकारच्या समितीने काही ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली होती. पाण्यासाठी मागेल त्या गावाला टँकर देण्याचे काम सुरू केले होते. गेली पाच महिने काही जिल्ह्यांत टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दुष्काळ आणि दुष्काळसदृश स्थिती जाहीर केल्याने कर्ज वसुली, शेतसारा वसुली, वीजबिल आदींची सक्ती बंद करण्यात आली आहे. ती अद्याप माफ करण्यात आलेली नाही. विद्यार्थ्यांची फी माफ करण्यात आली आहे. अशा साधकबाधक उपाययोजना दुष्काळाची घोषणा होताच केल्या जातात, त्यापलीकडे काही खास प्रयत्न झालेले दिसत नाहीत.

गेले तीन महिने लोकसभा निवडणुकीच्या राजकारणात नेतेमंडळी आणि मंत्रिमहोदय व्यस्त होते. प्रसारमाध्यमांनीदेखील दुर्लक्ष केल्याने महाराष्ट्राच्या दुष्काळाची तीव्रताच समोर आली नाही. केंद्र सरकारने केवळ तोंडदेखली पाहणी केली आहे. शेजारच्या कर्नाटक राज्यातही हीच तक्रार आहे. केंद्रीय समितीने ऑक्टोबरमध्येच कर्नाटक दौरा केला होता. शिवाय मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन दुष्काळ निवारणाच्या कामासाठी निधी देण्याची मागणी केली होती. केंद्राने कोणताही निर्णय न घेतल्याने राज्यातील काँग्रेसचे सरकार आणि केंद्रातील भाजपचे सरकार यांच्यात निवडणुकीच्या प्रचारादरम्यान वाद रंगला होता. प्रत्यक्षात निर्णय कोणतेच झाले नाहीत. महाराष्ट्राचीदेखील हीच हालत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मतदान झाल्याने आचारसंहिता शिथिल करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली.

तसेच परवा छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांचा आढावा घेतला. विरोधी पक्षांनी विशेषत: काँग्रेस पक्षाने दुष्काळी परिस्थितीविषयी राज्य सरकार गंभीर नसल्याचा आरोप केल्यानंतर या हालचाली सुरू झाल्या आहेत, असे म्हणायला जागा आहे. मराठवाड्यातील तीनच पालकमंत्री या बैठकीला उपस्थित होते.मराठवाड्यात खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामातील पिके साधली नव्हती. पिण्याच्या पाण्याची टंचाईदेखील अधिक तीव्र आहे. रोजगाराच्या संधी कमी असल्याने शहराकडे स्थलांतर वाढते आहे. अशा परिस्थितीत मंत्र्यांनी आढावा बैठकीला तरी उपस्थित राहून परिस्थितीची माहिती द्यायला हवी होती. नऊ महिन्यांपूर्वी राज्य मंत्रिमंडळाची खास बैठक छत्रपती संभाजीनगरला घेण्यात आली होती. तेव्हा ४५ हजार कोटी रुपयांचे पॅकेज मराठवाड्यासाठी देण्याची घोषणा करण्यात आली होती. मुख्यमंत्र्यांना यावर पत्रकारांनी छेडले तेव्हा या पॅकेजपैकी काय प्रत्यक्षात झाले, हे सांगताना त्यांची दमछाक झाली. केंद्र सरकारने मदत दिली नसल्याचेदेखील याच बैठकीत स्पष्ट झाले आहे. मराठवाड्याप्रमाणेच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत दुष्काळाची दाहकता आहे. त्याचाही आढावा घेणे महत्त्वाचे आहे. पालघर किंवा नाशिक, नंदुरबार आदी जिल्ह्यांतील आदिवासी पाड्यांवर पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे.

पश्चिम महाराष्ट्रात जमिनीखालील पाण्याची पातळी साडेचारशे फुटांनी खाली गेली आहे.मान्सूनपूर्व हंगामात पावसाची लक्षणे आशादायक वाटत असली तरी जुलैच्या पहिल्या आठवड्यातच दुष्काळी तालुक्यात पावसाचे आगमन होते. गेल्या काही वर्षांतील बदलत असलेल्या ऋतुमानाचा फटका बसला तर ग्रामीण भाग अडचणीत येणार आहे. सर्वांत मोठी अडचण पिण्याच्या पाण्याची आणि रोजगाराची आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील पाणीसाठा तुलनेने कमी आहे. मराठवाड्यात सर्व प्रकल्पांतील सरासरी पाणीसाठा केवळ दहा टक्के उरला आहे. राज्यात मागील वर्षाच्या तुलनेत दहा टक्के पाणीसाठा कमी आहे. यावर्षी उन्हाळी पाऊस चांगला होत आहे. तेवढाच आधार आहे. मराठवाड्याच्या वॉटरग्रीडसाठी जागतिक बँकेकडून कर्ज उभारण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आल्याचे सांगितले आहे.

ही योजना पूर्णत्वास येण्यास अजून किती वर्षे लागतील हे सांगता येणे कठीण आहे. शिवाय ही योजना यशस्वी होईल, याची शाश्वती किती आणि कोण देणार आहे? मराठवाड्यात पुढील चार महिने पुरेल इतका चारा असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.अलीकडच्या काळातील दुष्काळात पाण्याची टंचाई हा कळीचा मुद्दा ठरतो आहे. पाणीटंचाई आणि शेतकरी वर्गाने घेतलेल्या कर्जांची परतफेड हा गंभीर प्रश्न आहे. आधीच दुष्काळ असताना निवडणूक आचारसंहितेचा महिना आणखी अडचण करणार आहे. निवडणूक आयोगाने किमान पाणी, चारा टंचाई, तसेच रोजगाराची कामे सुरू करण्यास सहमती दिली पाहिजे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर बिबट्याविषयी झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा : आमदार बेनके



**नारायणगाव :** बिबट्यांचे वाढते हल्ले व समस्या या संदर्भातील विविध प्रश्नांवर आज मुंबई येथील मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत जुन्नर तालुक्याच्या शिष्टमंडळाची सकारात्मक चर्चा झाली अशी माहिती जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके यांनी दिली.

जुन्नर तालुक्यातील वाढत्या बिबट हल्ल्यांच्या समस्यांविषयी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे काल दि. २७ रोजी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार अतुल बेनके व शिष्टमंडळाने आपले म्हणणे मांडले त्यांनतर या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आज तालुक्यातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींसमवेत अजित पवार यांनी मुंबई येथे बैठक घेतली. यावेळी समवेत माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, माजी आमदार शरद सोनवणे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, आशाताई बुचके यांसह तालुक्यातील काही प्रमुख नेते आणि वन विभाग तसेच इतर सबंधित विभागाचे अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीमध्ये बिबट्यांचे वाढते हल्ले या संदर्भातील विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. यामध्ये सरकारने तातडीने काही उपाययोजना राबविण्यासाठी पाऊले उचलली आहेत. जुन्नर तालुका आणि परिसरातील बिबट्यांची वाढती संख्या लक्षात घेता दिसतील ते बिबटे सरसकट पकडून इतरत्र हलविण्याचे ठरवले आहे. यासाठी अधिकचे लागणारे पिंजरे येत्या २ महिन्यांमध्ये उपलब्ध करून देणार यामुळे जवळपास ३०० पिंजरे उपलब्ध होणार आहेत. बिबट निवारा केंद्र विस्तारीकरण करून या निवारा केंद्रातील बिबट्यांची क्षमता संख्या वाढवून तिप्पट म्हणजेच १५० बिबटे क्षमता इतकी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर यासाठी अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी जुन्नर तालुक्यात SLPF ( Special Leopard Protect Force ) नेमण्यात येणार आहे. या संवेदनशील प्रश्नामुळे काही ठिकाणी शेतकरी आणि अधिकारी यांच्यात वाद झाला आणि यातून शेतकऱ्यांवर दाखल झालेले गुन्हे रद्द करून मागे घेण्याबाबत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ते गुन्हे मागे घेतले जातील. विशेष बाब म्हणून जुन्नर, आंबेगाव खेड, शिरूर या भागातील शेतीसाठी दिवसा ३ फेज लाईट पुरविण्यासाठी सरकारकडून सकारात्मकतेने पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. मेंढपाळ व्यवसायिकांसाठी तंबू, बॅटरी आणि सोलर लाईटची व्यवस्था राज्य आपत्ती निवारण निधीतून करण्यात येणार आहे. तसेच मुजोर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात खात्यामार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या बैठकीदरम्यान जुन्नर तालुक्यातील बिबट्यांच्या हल्ल्या प्रश्नी महायुती सरकार संवेदनशील आहे असे उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी सांगितले. तसेच माझे सहकारी माजी आमदार शरद सोनवणे उपोषण मागे घेण्याची विनंती केली आणि त्यांनी ती विनंती मान्य केली आहे असे आमदार अतुल बेनके यांनी सांगितले.

# कणेरी मठातील सिद्धगिरी हॉस्पिटलमध्ये अँजिओग्राफी व हृदय उपचार मोफत



**कोल्हापूर :** पुज्यश्री काडसिद्धेश्वर स्वामीजींच्या 'निराधारांना आधार' या तत्वावर रुग्णसेवेत समर्पित असणाऱ्या कोल्हापूर येथील 'सिद्धगिरी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर' ने मानांकित धर्मादाय श्रेणीतील अग्रेसर 'सेवाभावी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल' अशी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी आता अँजिओग्राफी सोबत हृदय उपचार मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे.

आता ना नफा ना तोटा या तत्वावर मोफत व माफक दरात व पारदर्शक सेवा देणासाठी अत्यंत अत्याधुनिक असा हृदयरोग विभाग कार्यरत आहे. 'डॉ. गणेश इंगळे यांनी गेली १२ वर्ष हृदयरुग्णांसाठी प्रसिद्ध अशा नामांकित संस्थेत सेवा दिली आहे, ते आता सिद्धगिरी हॉस्पिटलच्या माध्यमातून आपली आरोग्य सेवा समाजातील सर्वच स्तरातील लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी कार्यरत झाले आहेत. त्यांच्या आरोग्य कौशल्याचा समाजातील गरजू लोकांनी या आरोग्य सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन पुज्यश्री काडसिद्धेश्वर स्वामीजींनी केले.

'पुणे ते बेंगलोर या परिक्षेत्रात धर्मादाय श्रेणीत पहिल्यांदाच अत्याधुनिक तंत्रज्ञानासह, वेगवेगळ्या चाचण्यांसह एकाच छताखाली हृदयरुग्णांना सेवा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे हृदयरुग्णांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अगदी लहानवयातील तरुणांनाहि हृदयरोगाशी सामना करावा लागत आहे. आज हृदयरुग्णांवर अत्याधुनिक उपचार घेणे हि क्लिष्ट बाब झाली आहे. आज सिद्धगिरी हॉस्पिटल मध्ये हृदयाशी संबंधित कोरोनरी अँजिओग्राफी, कोरोनरी अँजिओप्लास्टी, पेरीफेरल इंटरव्हेंशन- रिनल अँजिओग्राफी , रिनल अँजिओप्लास्टी , कायमस्वरूपी पेसमेकर रोपण तसेच स्ट्रक्चरल हार्ट इंटरव्हेंशन साठी आवश्यक उपचार दिले जातात. याशिवाय एएसडी, पीडीए, व्हीएसडी, कोअरक्टोप्लास्टी उपचार तसेच हृदयाची शस्त्रक्रिया हि केली जाते. या सेवेचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा.

पुज्यश्री काडसिद्धेश्वर स्वामीजींच्या मार्गदर्शनानुसार हा विभाग कार्यान्वित आहे. या विभागामुळे वंध्यत्व उपचार अत्यंत पारदर्शकपणे करण्यास अधिक हातभार लागणार आहे. या विभागात उपचार प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर गुणवत्तेशी तडजोड न करता अत्यंत अत्याधुनिक अशी कॅथ लॅब सह अन्य अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या विभागाच्या विविध तंत्रज्ञानाची माहिती दृक-श्राव्य (व्हिडीओ) माध्यमांच्या द्वारे उपस्थित पत्रकारांना दाखवून माहिती विशद केली. यावेळी या परिषदेची प्रस्तावना व आभार विवेक सिद्ध यांनी केले. यावेळी शंकरारूढ स्वामीजी, सिद्धगिरी हॉस्पिटलचे राजेंद्र शिंदे, कुमार चव्हाण, सत्याप्पा बाणे, दयानंद डोंगरे व अभिजित चौगले यांच्यासह रुग्णालय कर्मचारी उपस्थित होते.

# चार जूनच्या परीक्षा पुढे ढकला

## 'एनएसयुआय'ची मागणी



**पुणे :** चार जून रोजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्यात याव्या अशी मागणी नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया संघटनेकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे करण्यात आली आहे.

देशात पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीचा निकाल हा चार जूनला आहे. देशाचे भवितव्य घडवणाऱ्या या निकालाची सर्वांनाच उत्सुकता आहे. याच दिवशी विद्यापीठाच्या परीक्षा सूरू होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेस जाण्यासही अडचणी निर्माण होऊ शकतात.

पुणे एनएसयुआय महासचिव कृष्णा साठे व राज्य प्रवक्ता अविनाश सोळुंके यांनी हे निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे, देशात १८व्या लोकसभेची निवडणूक पार पडत आहे. महाराष्ट्रात पाचही टप्प्यातील मतदान पार पडले आहे. यंदाची लोकसभा निवडणूक देशातील युवकांनी हातात घेतली असून या निवडणुकीचा निकाल ०४ जून रोजी आहे. यंदाची लोकसभा निवडणूक देशाचे भवितव्य ठरवणारी आहे. सर्व विद्यार्थी वर्गाला व युवकांना लोकसभा निकालाची उत्सुकता मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र, ऐन निकालादिवशीच विद्यापीठाच्या परीक्षा सुरु असणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. ०४ जून रोजी असणाऱ्या सर्वच अभ्यासक्रमाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात. परीक्षा वेळापत्रकात बदल करणारे परिपत्रक व सुधारित वेळापत्रक तात्काळ जारी करण्यात यावे.

> **देशाचे भविष्य ठरवणारी लोकसभा निवडणूक विद्यार्थ्यांच्या आणि युवकांच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. चार जून च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाची उत्सुकता सर्वांनाच आहे. मात्र, याच दिवशी विद्यापीठाच्या परीक्षा आहेत. या दिवशी राजकीय वातावरण देखील संवेदनशील असणार आहे. चार जून रोजीच्या पुढे ढकलाव्या ही विद्यार्थ्यांची मागणी आहे.**
>
> **- कृष्णा साठे**
>
> **महासचिव, एनएसयुआय पुणे शहर व जिल्हा**

# ५१ व्या वर्षी दहावीच्या परीक्षेत यश



**मुंबई :** शिक्षणाला वयाची अट नसते असे म्हटले जाते. डोंबिवलीतील छाया वाघमारे यांनी हे खरं करून दाखवलं आहे. वयाच्या ५१ व्या वर्षी छाया यांनी दहावीच्या परिक्षेत ६६.२० टक्के गुण मिळवीत यश मिळवलं आहे.

ठाणे जिल्हयातील डोंबिवली शहरात राहणा-या छाया वाघमारे यांनी आपल्या कुटूंबाचा गाढा ओढत जिद्दीने १० वी पास होण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे. कमी वयात लग्न झाल्याने त्यांना १० वी पास होण्याचे त्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले होते परंतु तब्बल ३५ वर्षानंतर छाया यांनी पुन्हा मुबंई येथील व्ही. एस. एम. भायखळा नाईट हायस्कूल येथे ऍडमिशन घेतले.जिद्दीने दिवस रात्र अभ्यास केला.कोणतेही खाजगी क्लासेस न लावता शाळेत शिकवला जाणारा अभ्यासक्रम नियमित करत १० वीच्या परीक्षेत ६६.२० टक्के गुण मिळवले आहे. शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आणि सहकार्यामुळेच हे यश मिळाल्याचे छाया यांनी सांगितले. दरम्यान मागच्या वर्षी छाया यांनी नर्सिंग ची परीक्षा देत त्या उत्तीर्ण झाल्या यापुढेही अजून शिकायची इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे छाया यांना १ मुलगा आणि १ मुलगी असा त्यांचा परिवार आहे.

## गुजरातहून मुंबईकडे येणारी मालगाडी घसरली

मुंबई : गुजरातहून मुंबईच्या दिशेने येणा-या मालगाडीचे डब्बे घसरल्याची घटना पालघर रेल्वे स्थानकात घडली यामुळे मुंबईच्या दिशेने येणारी वाहतूक विस्कळीत झाली आहे.

मालगाडीचे पाच ते सहा डब्बे रूळावरून घसरले आहेत या अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी रेल्वे स्थानक परिसरात एकच गर्दी केली. या अपघातामुळे पश्चिम रेल्वेची डहाणूपर्यंत धावणारी उपनगरीय रेल्वे सेवा आणि मेल एक्स्प्रेसवर परिणाम झाल्याने वाहतूक सेवा कोलमडली आहे.

# महिलेचा विनयभंग करुन फरार झालेल्या ओला कॅब चालकास देहु रोड पोलीसांकडून अटक



**पिंपरी चिंचवड :** पुणे मुंबई रस्त्यावर असलेले देहुरोड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. २७२/२०२४ कलम ३५४ भा.द.वि अन्वये दाखल गुन्हयातील फिर्यादी महीला यांनी दि. १४/०५/२०२४ रोजी फिर्याद दिली होती की, फिर्यादी या कोरेगाव पार्क येथे आपल्या मित्राच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाकरीता कॅब क्र. एम.एच. १४ एल.बी. ४१३३ याने जात असताना कॅब चालक राहुल पांडुरंग म्हस्के रा. थेरगाव, पिंपरी-चिंचवड पुणे यांने सदरची कॅब कोरेगाव पार्क दिशेने न नेता उलट दिशेने देहूरोड पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये आणली तीने सदर महीलेच्या एकटेपणाचा फायदा उचलुन त्याचा वाहणामध्ये विनंयभंग केला.

त्यानुसार सदरचा गुन्हा देहुरोड पोलीस स्टेशन येथे दाखल झाला होता. गुन्हा दाखल झाले पासुन कॅब चालक आरोपी राहुल पांडुरंग म्हस्के रा. थेरगाव पिंपरी- चिंचवड, पुणे हा आपले अस्तीत्व लपवुन पुणे शहरातंर्गत वावरत होता त्याचा कोणताही प्रकारचा संपुर्ण पत्ता व माहीती नसताना देहुरोड पोलीस स्टेशनचे तपास पथकाच्या अधिकारी अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन सदर आरोपीचा पत्ता शोधुन काढुन त्यास शिताफीनी पकडुन दाखल गुन्हयामध्ये अटक केली आहे.

तसेच गुन्हयामधील वापरती कॅब क्र. एम.एच. १४ एल.बी. ४१३३ ही सुध्दा अटक आरोपीकडुन जप्त केली आहे अधिकचा तपास देहुरोड पोलीस करत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ बापू बांगर सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, देहरोड विभाग श्री. घेवारे सो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय वाघमारे, यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार राठोड, पोउपनि पी.टी खनसे, पोलीस अंमलदार प्रशांत पवार, बाळासाहेब विधाते, संतोष जाधव, सुनिल यादव, किशोर परदेशी, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडीक, निलेश जाधव, मोहसिन आत्तार, युवराज माने, शुभम बावनकर, स्वप्नील साबळे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९

Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# अकोल्याच्या तरुणीची दिल्लीत निर्घृण हत्या

**अकोला :** जुने शहरातील डाबकी रोड पोलिस स्टेशनच्या हद्दीतील एका ३० वर्षीय युवतीची दिल्ली येथील गुरुग्राम अंतर्गत येणाऱ्या टिकरी भागात प्रियकराने चाकू भोसकून व नंतर डोक्यात सिलींडरने प्रहार करुन निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. युवतीची हत्या केल्यानंतर मारेकरी प्रियकराने टिकरी परिसरातील सदर पोलिस ठाण्यात जाऊन आत्मसमर्पण करुन गुन्ह्याची कबुली दिली.

हत्येची घटना १८ मे रोजीच्या रात्री आठ वाजता झाल्याची माहिती आहे.

सारीका वानखडे (वय ३०, रा.लक्ष्मी नगर डाबकी रोड अकोला) असे हत्या झालेल्या युवतीचे नाव असून सुरज वर्मा (वय २३,रा.वानखडे नगर डाबकी रोड अकोला)असे हत्या करणाऱ्या युवकाचे नाव आहे. डाबकी रोड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोघांमध्ये मागील काही वर्षांपासून प्रेमसंबंध होते.




परंतु मध्यंतरी त्यांचे बिनसल्यामुळे सारीकाने सुरज याच्या विरोधात पोलिस तक्रार दाखल केली होती. नंतर या दोघांत समेट झाल्यामुळे तीने पोलिस तक्रार मागे घेतली होती.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी सुरज हा खासगी नोकरीनिमीत्त पुण्याला निघून गेला. पुढे तेथून त्याची बदली दिल्ली येथील गुरुग्राम अंतर्गत येणाऱ्या टिकरी भागात झाली. घटनेच्या तीन दिवसांपूर्वी सारीकाने सुरजसोबत संपर्क साधून दिल्ली गाठली. भेटीदरम्यान १८ मे रोजी रात्री त्यांच्यात झालेला वाद विकोपाला गेला. रागाच्या भरात सुरजने तीच्या डोक्यात व गळ्यावर धारदार चाकूने अनेक वार केले.

तसेच डोक्यावर सिलींडरने प्रहार केले. सारीकाची हत्या केल्यानंतर सुरजने टिकरी परिसरातील सदर पोलिस ठाणे गाठले. व युवतीची हत्या केल्याची कबुली पोलिसांना दिली.

सारीकाकडून सतत पैशांची मागणी केली जात होती. पैसे न दिल्यास ती पोलिसात तक्रार करण्याची धमकी देत असल्यामुळे तीचा खून केल्याची कबुली मारेकरी युवकाने सदर पोलिस स्टेशनमध्ये दिली.

याप्रकरणी सदर पोलिस स्टेशनमध्ये सुरज वर्मा याच्या विरोधात हत्या केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या हत्येप्रकरणी तरुणीच्या कुटुंबियांनी डाबकी रोड पोलिस ठाण्यात संपर्क साधला. आम्ही दिल्ली येथील संबंधित पोलिस स्टेशनसोबत संपर्क केला. त्यानंतर तरुणीचे कुटुंबिय दिल्लीकडे रवाना झाले.

# राष्ट्रवादीने पत्ते उघडले

## शिक्षक मतदारसंघासाठी सुनिल तटकरेंनी केली उमेदवाराच्या नावाची घोषणा

**मुंबई :** राज्यात लोकसभा निवडणुकीसाठी मतदान संपल्यानंतर आता विधानपरिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. विधानपरिषदेच्या ४ जागांसाठी निवडणूक होत असून या निवडणुकीच्या निमित्ताने महायुती आणि महाविकास आघाडीत अंतर्गत संघर्ष रंगण्याची शक्यता आहे. कारण प्रत्येक पक्ष ही निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असून उमेदवारांचीही घोषणा केली जात आहे. उपमुख्यमंत्रीअजित पवारयांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी आज आपल्या पक्षाकडून मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी शिवाजीराव नलावडे यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

शिवाजीराव नलावडे यांनी पक्षाकडे मुंबई शिक्षक मतदारसंघातून उमेदवारीची मागणी केली होती. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्षअजित पवारयांच्या नेतृत्वात काल झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत नलावडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं, अशी माहिती आज प्रसारमाध्यमांशी बोलताना तटकरे यांनी दिली आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीला राज्यातील मोठे राजकीय पक्ष महायुती आणि महाविकास आघाडीच्या माध्यमातून सामोरे गेले होते. मात्र आता विधानपरिषद निवडणुकीत मात्र बहुतांश पक्षांनी एकला चलो रेचा नारा दिल्याने राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. कोणत्या मतदारसंघांत होणार निवडणूक?विधान परिषदेच्या मुंबई व कोकण पदवीधर तसेच मुंबई आणि नाशिक शिक्षक या चार मतदारसंघांसाठी पुढे ढकललेला निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम शुक्रवारी निवडणूक आयोगाने जाहीर केला. त्यानुसार चार जागांसाठी येत्या २६ जून रोजी मतदान होणार असून, मतमोजणी १ जुलै रोजी होणार आहे. विधानपरिषदेत मुंबई पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे उद्धवसेनेचे विलास पोतनीस, कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपचे निरंजन डावखरे, मुंबई शिक्षकचे कपिल पाटील व नाशिक शिक्षकचे किशोर दराडे यांची सदस्यत्वाची मुदत ७ जुलै २०२४ रोजी संपत आहे. त्यामुळे या चार जागांसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. मुंबई शिक्षक मतदारसंघातून शिक्षक सेनेचे प्रांताध्यक्ष असलेले ज. मो. अभ्यंकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या मतदारसंघातून सध्या कपिल पाटील आमदार आहेत. आता भाजपा इथे कोणाला उतरविते याकडे पाहणे गरजेचे आहे.

**असा आहे निवडणूक कार्यक्रम**

**अधिसूचना : ३१ मे २०२४**

**अर्ज भरण्याची अंतिम तारीख : ७ जून**

**अर्जांची छाननी :** १० जून २०२४

**अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख : १२ जून २०२४**

**मतदान :** २६ जून २०२४ **रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंतमतमोजणी :** १ जुलै २०२४

# अनैतिक संबंधाच्या संशयावरून डोक्यात दगड घालून खून, चौघांवर गुन्हा

**सातारा :** अनैतिक संबंधाच्या संशयावरून एका ४० ते ४५ वर्षांच्या अनोळखी व्यक्तीचा डोक्यात दगड घालून व त्याला बेदम मारहाण करून खून करण्यात आला. ही घटना १८ मे रोजी सुरूर ता. वाई येथे घडली असून, याप्रकरणी भुईंज पोलिस ठाण्यात चौघांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जक्कल रंगा काळे, संगीता ऊर्फ टिमकी जक्कल काळे, सोनू जक्कल काळे, मक्शा रंगा काळे (सर्व रा. सुरूर, ता. वाई, जि. सातारा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, सुरूर गावच्या हद्दीतील माळावरच्या झोपडपट्टीमध्ये १८ मे रोजी वरील संशयितांनी अनैतिक संबंधाच्या संशयावरून त्या अनोळखी व्यक्तीला बेदम मारहाण केली. तसेच डोक्यात दगड घालून त्याला गंभीर जखमी केले.

दरम्यान, जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना २३ रोजी सायंकाळी सहा वाजता संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाला. भुईंज पोलिसांनी तपास केल्यानंतर हा खुनाचा गुन्हा उघडकीस आला. परंतु त्या व्यक्तीची ओळख पटली नसून, पोलिस त्या व्यक्तीची ओळख पटविण्याचा प्रयत्न करत आहेत. सहायक पोलिस निरीक्षक रमेश गर्जे हे अधिक तपास करीत आहेत.

# दुष्काळग्रस्त भागाच्या पाहणीसाठी प्रदेश काँग्रेसच्या विभागनिहाय समित्या गठित

## दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून विभागीय आयुक्तांना अहवाल सादर करणार

**मुंबई :** राज्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आहे, पिण्याच्या पाण्याची व जनावरांच्या चाऱ्यांची मोठी समस्या असून रोजगारही मिळत नाहीत. जनता दुष्काळाने होरपळ असताना महायुती राजकीय साठमारीत व्यस्त आहेत त्यामुळे राज्यातील दुष्काळग्रस्त भागाला भेट देऊन तेथील परिस्थितीची माहिती घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने विभागनिहाय दुष्काळ पाहणी समित्यांची स्थापना केली आहे. या समित्या दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून विभागीय आयुक्तांना व प्रदेश काँग्रेसला अहवाल सादर करणार आहेत.

प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या निर्देशानुसार व प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांच्या सुचनेवरून विभागवार जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे.

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे मराठवाडा विभागाच्या समितीचे प्रमुख आहेत.

विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात ह्यांच्याकडे उत्तर महाराष्ट्र विभागाची जबाबदारी दिली आहे. नागपूर विभागाच्या समितीचे प्रमुख विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आहेत. पश्चिम महाराष्ट्राचे समिती प्रमुख माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आहेत.

कोकण विभाग समितीचे प्रमुख प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान आहेत तर अमरावती विभाग समिती प्रमुख माजी मंत्री यशोमती ठाकूर आहेत. या समितीत राज्यातील प्रमुख नेते, आमदार, माजी मंत्री, पदाधिकारी यांचाही समावेश आहे.

ही समिती दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेणार असून विभागीय आयुक्तांना निवेदन देणार आहेत तसेच प्रदेश काँग्रेसला आपला अहवाल देणार आहेत.

# पुणे 'हिट अँड रन' प्रकरण : अजित पवार यांची नार्को टेस्ट करा : अंजली दामनिया यांची मागणी

**मुंबई :** पुण्यातील 'हिट अँड रन' प्रकरणानंतर आता राजकीय घडामोडींना वेग आलाय. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली असतानाच, दुसरीकडे पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पोलिसांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. अजित पवारांचे फोन जप्त करावा करावा आणि त्यांची नार्को टेस्ट करावी, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केलेली आहे. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलंय.

अजित पवार नेहमी पत्रकार परिषदेमध्ये भडकून बोलत असतात, तेच अजित पवार कालच्या पत्रकार परिषदेत गांगरल्यासारखे वागत होते, असंही अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे.

आमदार सुनील टिंगरे पोलीस स्टेशनमध्ये का आले होते? कोणाच्या सांगण्यावरुन आले होते? हे एकदा टिंगरेंना देखील विचारलं पाहिजे. काल त्यांनी जे जे सांगितलं ते धादांत खोटं होतं. अजित पवारांनी निश्चितच आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळं अजित पवारांचा फोन खरंतर जप्त झाला पाहिजे खरंतर त्यांची नार्को टेस्टही व्हायला हवी होती, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे.

# सांगलीतील खुंदलापूर येथे गव्याच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी

**वारणावती :** खुंदलापूर (ता. शिराळा) येथे गव्याच्या हल्ल्यात ठकुजी गंगाराम शेळके (वय ६५) हा शेतकरी गंभीर जखमी झाला. चांदोली अभयारण्याच्या सीमेवर खातवाड नामक खासगी मालकीच्या शेतात आज, मंगळवारी सकाळच्या सुमारास ही घटना घडली. ठकुजी शेळके जनावरे चरायला सोडण्यासाठी गेले असता पाठीमागून आलेल्या गव्याने त्यांच्यावर हल्ला केला.

गव्याने शेळके यांना शिंगावर उचलून शेतात फेकून दिले. त्यात त्यांच्या पाठीत खोल जखम झाली आहे. हल्ल्यावेळी शेजारीच घरात काम करीत असलेल्या लोकांनी आरडाओरडा केल्याने गवा डोंगराच्या दिशेने पळून गेला. जखमी शेळके यांना खासगी वाहनातून मणदूर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रज्ञा पाटील यांनी त्यांच्यावर प्रथमोपचार केले. पोलिस पाटील धाकलू गावडे यांनी गव्याच्या हल्ल्याची माहिती वन विभागास दिली. त्यानंतर वनपाल व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठांना कळविले. वन विभागाने पुढील उपचारांसाठी शासकीय वाहनातून कराड येथील कृष्णा रुग्णालयात पाठविले.

दरम्यान, हल्ल्याची माहिती मिळताच माजी सरपंच वसंत पाटील, सावळाराम पाटील, राम माने आदींनी घटनास्थळी धाव घेतली. गव्याच्या हल्ल्यामुळे खुंदलापूर व मणदूर परिसरात भितीचे वातावरण आहे. खुंदलापूर परिसरात मोबाईलला नेटवर्क मिळत नसल्याने १०८ रुग्णवाहिकेशी संपर्क साधता आला नाही. जखमी शेळके यांना खासगी वाहनातून मणदूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात आणावे लागले.

# त्र्यंबकेश्वर इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये नाही

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाने पर्यावरण वाद्यांना धक्का



**नाशिक :** बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वरजवळ ब्रह्मगिरी येथे मोठ्या प्रमाणात बांधकामे होऊ लागली आहे. या संदर्भात पुण्यातील राष्ट्रीय हरित लवादात दाखल याचिकेत जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला असून त्रंबकेश्वर गाव हे इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये येत नसल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच येथील बांधकामही त्र्यंबकेश्वर नगरपालिकेच्या परवानगीनेच होत असल्याचे सांगितल्याने पर्यावरण वाद्यांना धक्का बसला आहे.

त्र्यंबकेश्वर परिसरातील ब्रह्मगिरी हे गोदावरी नदीचे उगमस्थान असून गेल्या काही वर्षांपासून या ठिकाणी बांधकामी सुरू लागले बऱ्याच ठिकाणी रिसॉर्ट होत आहे.

त्र्यंबकेश्वर नगरपालिकेने या बांधकामांना परवानगी दिली असली तरी या बांधकामांमुळे जैवविविधता नष्ट होऊ शकते. तसेच ब्रह्मगिरीला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे यापूर्वीही पर्यावरण कार्यकर्त्यांनी बांधकामे आणि उत्खननाला विरोध केला होता. माजी जिल्हाधिकारी सुरज मांढरे यांनी त्र्यंबकेश्वर परिसर इको सेन्सिटिव्ह झोन जाहीर करणार असल्याची सांगितले होते.

दरम्यान, या भागात बांधकामे सुरू झाल्यामुळे येथील सामाजिक कार्यकर्त्या ललिता शिंदे यांनी पुणे येथील राष्ट्रीय हरित लवादात याचिका दाखल केली होती. त्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांना संयुक्त पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश हरित लवादाने दिले होते.

हा अहवाल नुकताच सादर करण्यात आला असून यात त्र्यंबकेश्वर गाव हे इको सेंसिटिव्ह झोन मध्ये नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. इतकेच नव्हे तर त्र्यंबकेश्वर नगरपालिकेच्या परवानगीनेच बांधकामे करण्यात येत असल्याचे अहवालात नमूद केल्याने या बांधकामांना अभय मिळाले आहे.

दरम्यान याचिकाकर्त्या ललिता शिंदे यांनी अहवाला विषयी नाराजी व्यक्त केली असून या संदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# अलमट्टीच्या पाण्यावर महाराष्ट्राने नियंत्रण ठेवावे

## महापूर नियंत्रण समितीची भूमिका

**कोल्हापूर :** केंद्रीय जल आयोगाच्या निर्देशानुसार जून, जुलै आणि ऑगस्ट या महिन्यात प्रत्येक राज्यातील धरणातील पाणी पातळी किती असावी, हे निश्चित केलेले आहे. त्यानुसार अलमट्टी धरणातील पाण्याची पातळी राखण्याचे काम कर्नाटक राज्य करत नाही, असा आरोप महापूर नियंत्रण नागरी कृती समितीने केला आहे. अलमट्टीच्या पाण्यावर महाराष्ट्राचे नियंत्रण ठेवण्यासाठी समितीने जिल्हाधिकाऱ्यांना साकडे घातले आहे. यासंदर्भात चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी ७ जूनला बैठकीसाठी समितीला निमंत्रण दिले आहे.

यापूर्वी दोन वेळा महापूर आले आहेत. त्यामुळे अलमट्टीच्या पाणी पातळीवर राज्य सरकारने समन्वयाने नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे, अशी भूमिका कृष्णा महापूर नियंत्रण नागरी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली आहे. याबाबत चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी



बैठक बोलवावी, असे निवेदन सोमवारी त्यांनी दिले. त्यानंतर पत्रकार परिषदेत त्यांनी आपली भूमिका मांडली.


यावेळी पाटबंधारे विभागाचे निवृत्त अभियंता आणि महापुराचे अभ्यासक विजयकुमार दिवाण, सर्जेराव पाटील, संजय कोरे, प्रदीप वायचळ, सुयोग हावळ उपस्थित होते.दिवाण यांनी अलमट्टी धरण हेच सांगली आणि कोल्हापुरातील महापुराचे मुख्य कारण असल्याचा आरोप केला. या धरणाची पाणीपातळी ३१ ऑगस्टपर्यंत ५१७.४० मीटर ठेवणे बंधनकारक आहे. २०१९ आणि २०२० या दोन्ही वेळी ही पातळी ओलांडल्याने महापूर आले.

यासाठी महाराष्ट्र सरकारने जलसंपदा विभागाचे अभियंता अलमट्टी धरणावर ठेवून दैनंदिन पाणी पातळी नोंदवावी, कर्नाटकला अलमट्टीमधील पाणी पातळी निर्देशाप्रमाणे ठेवण्यास भाग पाडावे, अशी भूमिका त्यांनी मांडून कर्नाटक सरकार महाराष्ट्राला कोणत्याही प्रकारचे सहकार्य करत नाही, आवश्यक माहिती, आकडेवारी देत नाही, असा आरोप केला. दरम्यान, समिती यासंदर्भात ७ जूनला जिल्हाधिकारी कार्यालयात आपली भूमिका मांडणार असून १६ जूनला नृसिंहवाडी येथे महापूर परिषद घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

समितीचे निमंत्रक सर्जेराव पाटील यांनी केंद्रीय जल आयोगाने धरणातील पाणीसाठ्याचे नियम बदलावेत, अशी मागणी केली.

त्यांच्या मते पावसाचे वेळापत्रक बदलत असते. २५ जुलै ते ७ ऑगस्ट या कालावधीत पावसाचे प्रमाण जास्त असते. त्यानुसार धरणातील पाणी साठ्याचे नियमही बदलणे गरजेचे आहे. राधानगरी, वारणा या धरणातील विसर्ग पूर्ण झाल्यावर कोयनेमधील विसर्ग केला पाहिजे, अशा पद्धतीने महापूर नियंत्रित करता येऊ शकतो, हे आम्ही दाखवून देऊ.

# प्रीपेड मीटर सक्तीच्या विरोधात आंदोलन मोहीम चालवा, महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचं आवाहन



**मुंबई -** राज्यातील शेतीपंप वगळता सर्व २.२५ कोटी वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावण्यासाठी २७ हजार कोटी म्हणजे प्रति मीटर १२ हजार रुपये खर्च केले जाणार आहेत. यापैकी २ हजार कोटी म्हणजे प्रति मीटर ९०० रुपये अनुदान केंद्र सरकारकडून मिळणार आहे. उरलेली सर्व रक्कम महावितरणला कर्ज रूपाने उभी करावी लागणार आहे. हे कर्ज व त्यावरील व्याज, घसारा, संबंधित अन्य खर्च अशा सर्व खर्चाची भरपाई वीज ग्राहकांना दरवाढीच्या रूपाने मोजावी लागणार आहे. त्यामुळे १ एप्रिल २०२५ पासून प्रत्येक ग्राहकाच्या वीज बिलामध्ये प्रति युनिट किमान ३० पैसे वाढ होणार आहे.

सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या दृष्टीने कोणताही उपयोग नसलेल्या स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती सर्वसामान्य ग्राहकांच्यावर करता कामा नये, यासाठी राज्यातील जागरूक वीज ग्राहक, या क्षेत्रातील जाणकार कार्यकर्ते व ग्राहक प्रतिनिधी, सर्व वीजग्राहक संघटना, सर्व औद्योगिक व समाजसेवी संघटना आणि सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते या सर्वांनी या प्रीपेड मीटर सक्तीच्या विरोधात चळवळ आणि आंदोलन मोहीम चालवावी, असे आवाहन महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी केले आहे.

मीटर्स लावल्यानंतर सर्वसामान्य ग्राहकांना त्याचा नेमका कोणता लाभ होईल ? हे स्पष्ट नाही. ग्राहकांना रोजचा वापर समजेल, खात्यावर रक्कम किती शिल्लक आहे हे कळेल आणि सोयीनुसार दर आठवड्याला रिचार्ज करता येईल एवढी जमेची बाजू आहे. प्रत्यक्षात तोट्याच्या बाजू अनेक आहेत, असे प्रताप होगाडे यांचे म्हणणे आहे.

# कपाशीच्या विशिष्ट वाणाचे बियाणे मिळत नसल्याने शेतकरी आक्रमक

**अकोला :** जिल्ह्यामध्ये खरीप हंगामाकरिता १ लाख ३५ हजार ५०० हेक्टर क्षेत्रावर कापसाची पेरणी प्रस्तावित आहे. त्या क्षेत्राकरिता प्रती हेक्टर ५ बियाणे पाकिटानुसार एकूण ६ लाख ७७ हजार ५०० पाकिटांची मागणी कृषी आयुक्तालयास करण्यात आलेली होती. दरम्यान जिल्ह्यात सुरुवातीपासूनच बीटी कपाशीच्या एका वाणाची मागणी प्रचंड आहे. सध्या बियाणे मिळण्यासाठी शेतकरी पहाटेपासूनच शहरातील कृषी सेवा केंद्रांवर रांगा लावत आहेत. विशिष्ट वानाचे बियाणे शेतकऱ्यांना मिळत नसल्याने मंगळवार, दि. २८ मे रोजी शहरात शेतकऱ्यांचा आक्रोश पहावयास मिळाला. पोलीस कर्मचारी व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी मधस्थी केल्याने वातावरण शांत झाले.



यंदा जिल्ह्यात कपाशीचे क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. जिल्ह्यामध्ये कापूस बियाणे पुरवठा करणारे बियाणे उत्पादक कंपनीकडून पुरवठ्याचे नियोजनसुद्धा घेण्यात आले आहे. त्यानुसार जिल्ह्यामध्ये ७ लाखपेक्षा जास्त बियाणे पाकिटांचा पुरवठा करण्याचे बियाणे कंपन्यांनी नियोजन सादर केलेले आहे.

परंतू जिल्ह्यात बीटी कपाशीच्या एका वाणाची प्रचंड मागणी असून, शेतकरी बियाणे मिळविण्यासाठी पहाटेपासूनच रांगा लावत आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांमध्ये वाद झाल्याची घटनाही समोर आली आहे. मंगळवारी शेतकऱ्यांनी बियाण्यासाठी कृषी सेवा केंद्रांवर रांग केली होती. परंतू बियाणे मिळत नसल्याने शेतकरी आक्रमक झाल्याचे दिसून आले.

जिल्ह्यामध्ये दि. १६ मे पासून कपाशी बियाणे वाटपाला सुरुवात झाली असून, तेव्हापासूनच जिल्ह्यात विशिष्ट एकाच वाणाची मागणी मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून आले. बियाण्यासाठी शेतकरी सकाळपासूनच कृषी सेवा केंद्रांवर रांगा लावत आहेत. दरम्यान, आता जिल्ह्यात मागणी असलेल्या विशिष्ट वाणाचा कंपनीकडूनच पुरवठा थांबवला असून, यासंदर्भात कंपनी प्रशासनाने विभागीय कृषी सहसंचालकांना पत्राद्वारे कळविले आहे.

आतापर्यंत कंपनीने सुधारित नियोजनानुसार १ लाख ५२ हजार पाकिटांचा पुरवठा जिल्ह्यामध्ये केला आहे.

# सातारा जि प. कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तिका नसल्याने पर्याय खुला

**सातारा :** सातारा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात आरोग्य सहाय्यक म्हणून काम करून सेवानिवृत्त झालेले आरोग्य सहाय्यक श्री प्रल्हाद पवार यांचे मूळ सेवा पुस्तक जिल्हा परिषदेच्या अभिलेख वर्गीकरण मध्ये सापडत नसल्याने त्यांना शासकीय देयक मिळण्यास विलंब लागत आहेत. आता याबाबत सातारा जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री निलेश घुले यांच्या प्रयत्नाने सकारात्मक भूमिका घेऊन पर्याय खुला केला आहे . आता तब्बल दहा वर्षांनी सातारा जिल्हा परिषदेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना न्याय मिळण्यासाठी सुरुवात झाली आहे.



याबाबत माहिती अशी की, सातारा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग व साथरोग शाखा व आरोग्य प्रशिक्षण केंद्र या ठिकाणी आरोग्य सहाय्यक पदावर श्री प्रल्हाद सर्जेराव पवार यांनी काम केले व सेवानिवृत्त झाले. त्यांना सेवानिवृत्तीनंतर गट विमा मंजुरीचा प्रस्ताव मंजुरी झाला. यासाठी अर्थ विभागाने दिनांक २२ एप्रिल २०१४ रोजी त्यांचे मूळ सेवा पुस्तक आरोग्य जिल्हा परिषद सातारा कडे पाठवले होते. तसेच जिल्हा प्रशिक्षण केंद्रातून हे सेवा पुस्तक पाठवल्याचे पत्र सुद्धा त्या विभागाकडून जोडण्यात आले होते.

यानंतर सेवानिवृत्त आरोग्य सहाय्यक श्री प्रल्हाद पवार यांचे मूळ सेवा पुस्तकाची मागणी केल्यानंतर सदरचे सेवा पुस्तक सर्व अभिलेखाच्या पडताळणी केल्यानंतर आढळून आले नाही. शासन वित्त विभागाकडील दिनांक २८ जून २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार जून मध्ये सेवानिवृत्त झालेल्या एक जुलै रोजीच्या काल्पनिक वेतन वाढ मंजूर करून त्यांना अर्ज केलेले तीन वर्ष अगोदर निवृत्ती वेतन फरक व काल्पनिक वेतन वाढीचे अनुशेष देयक अदा करण्याचे आदेश आले. या देयकासाठी ते गेले आठ महिन्यापासून सातत्याने मूळ सेवा पुस्तिका मिळवण्यासाठी अर्ज करत आहेत .पण, त्यांची सेवा पुस्तिका सापडत नसल्याने त्यांची सातारा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात भटकंती सुरू झाली होती . तसेच ते आर्थिक लाभापासून वंचित राहिलेले आहेत.

गेली सहा महिने सेवानिवृत्त झालेले आरोग्य सहाय्यक हे मूळ सेवा पुस्तिका साठी अर्ज व निवेदन देत आहेत .नवलाईची गोष्ट म्हणजे सातारा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात काम करणारे कर्मचारी श्री पवार यांच्या चौकशी कामी कंटाळले आहेत. पण अजूनही त्यांची मूळ सेवा पुस्तिका सापडली नाही. की नेमकी कुठे गेली यासाठी आता पोलीस यंत्रणेकडे धाव घेतली जाणार आहे.

श्री पवार यांनी सातारा जिल्हा परिषद आरोग्य विभाग, वैद्यकीय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र जिल्हा परिषद सातारा यांच्याकडे सातत्याने पत्रव्यवहार केल्या. माहितीचा अधिकार वापरला पण त्यांना दाद देण्यात आली नाही. मूळ सेवा पुस्तक सापडले नसल्याने सेवानिवृत्त आरोग्य सहाय्यक श्री पवार यांचा अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे. असं जिल्हा प्रशिक्षण केंद्र वैद्यकीय अधिकारी यांनी १९ मार्च २०२४ रोजी श्री पवार यांना पत्राद्वारे कळविले आहे. त्याच पद्धतीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सुद्धा मूळ सेवा पुस्तिका सापडत नसल्याचे लेखी कळविले आहे.

# आंतरजिल्हा बदलीप्राप्त शिक्षकांना प्रमाणपत्राच्या पडताळणीनंतर नियुक्ती

**सातारा :** सातारा जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग अंतर्गत प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्ती व बदल्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या आवारात मोठ्या संख्येने प्राथमिक शिक्षकांनी गर्दी केली . या शिक्षकांनी नियुक्त बदलीसाठी दिलेल्या प्रमाणपत्राची पडताळणी करूनच त्यांना पत्र दिले जाईल अशी माहिती सातारा जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती शबनम मुजावर यांनी दिली आहे

एप्रिल महिन्यामध्ये लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता असल्यामुळे सातारा सांगली सोलापूर सिंधुदुर्ग रत्नागिरी या जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची शासकीय सेवेतील बदली व नियुक्ती दिली गेली नाही. आता प्राथमिक शाळा सुरू होण्यासाठी काही दिवसाचा अवधी असतानाच सातारा जिल्हा परिषदेने आंतरजिल्हा व जिल्हातर्गत बदलीप्राप्त शिक्षकांना शाळा व नियुक्ती आदेश देण्यासाठी काहींनी सादर केलेल्या कागदपत्राची पडताळणी केली जात आहे.

राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू, दिव्यांग यासारख्या आरक्षणातील शिक्षकांची कागदपत्रे पडताळणी करुनच इतर जिह्यातील बदली प्राप्त शिक्षकांना सातारा जिह्यात सोडण्यात आले नव्हते. गेल्या सहा दिवसांपासून इतर जिह्यातून अशा प्रवर्गातील शिक्षकांना सोडण्यात येत असून त्यांना नियुक्ती आदेश देण्यासाठी शिक्षण विभागाकडून कार्यवाही सुरु केली आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा सुरु होण्यापूर्वी त्यांना संबंधित शाळेत नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे . ज्ञानदान करण्यासाठी अनेक शिक्षक इच्छुक असून काहींनी चक्क दुर्गम भागात सुद्धा काम करण्याची तयारी ठेवलेली आहे. अशी माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती शबनम मुजावर यांनी दिली आहे.

दुर्गम भागातील दोन विद्यार्थी असलेल्या शाळेत पट वाढवण्याची तयारी अशा शिक्षकांनी केली आहे त्यांचे मनापासून कौतुक होत आहे.

सातारा जिह्यातील आतंरजिल्हा व जिल्हातंर्गत बदली प्राप्त काही प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या या लोकसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वी करण्यात आल्या. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती याशनी नागराजन यांच्याकडे सातारा जिह्यातील शिक्षक संघटनांनी केलेल्या मागणीनुसार त्यांनी आचारसंहितेत बदल्यांची प्रक्रिया अडकू नये. म्हणून कार्यवाही पूर्ण केली.

त्यावेळी शिक्षकांना नियुक्त्याही दिल्या गेल्या आहेत. मात्र, सोमवारी सकाळी ११ पासून सातारा जिल्हा परिषदेच्या परिसरात शिक्षक मोठया प्रमाणात दिसत होते. तेव्हा त्यांना विचारले असता आम्ही आंतरजिल्हा प्राथमिक शिक्षक बदली आदेश घेण्यासाठी आलेलो आहोत. असे सांगण्यात आले.

याबाबत सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती शबनम मुजावर यांनी सांगितले की, इतर जिह्यातून सातारा जिल्ह्यातील प्राथमिक शाळेत खेळाडू, दिव्यांग या प्रवर्गातील हे प्राथमिक शिक्षक आहेत. त्यांना शाळा देण्यासाठी आपण जो कार्यक्रम तयार केला आहे त्यानुसार कार्यवाही करुन शाळा सुरु होण्यापूर्वी सर्वच शिक्षकांना शाळा दिली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# सांडव्याच्या भिंतीजवळ पर्यटकांचा धिंगाणा, सुरक्षा यंत्रणा कुचकामी



**वारणावती :** पंधरा दिवसांपूर्वी चांदोली धरणाच्या सांडव्याजवळील डोहात बुडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच शनिवारी दुपारी चांदोली परिसरात पर्यटनाला आलेल्या हुल्लडबाज पर्यटकांनी थेट धरणाच्या मुख्य भिंतीपर्यंत धाव घेतली. आठ ते दहा तरुण धरणाच्या सांडव्याखालील डेड स्टोरेज गेटच्या पाण्यात डुबक्या घेताना दिसून आले. धरणाच्या मुख्य गेटजवळ पर्यटक पोहोचतातच कसे? धरण प्रशासनाची सुरक्षा काय करते, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

सध्या उन्हाळी सुटी असल्याने चांदोलीला पर्यटकानी पुन्हा गर्दी होत होती. त्यातच दोन दिवस सलग सुटी आल्यामुळे पर्यटकांची गर्दी जास्तच होती. मात्र चांदोलीच्या पर्यटनाला गालबोट लागण्याचे प्रकार हुल्लडबाज पर्यटकांमुळे वारंवार होत आहेत.

काही हुल्लडबाज पर्यटक मद्यप्राशन करून धरणाच्या नियमावलीचा भंग करतात. मागील काही दिवसात या परिसरात आठ पर्यटकांचा मृत्यू होऊनही धरणाची सुरक्षा यंत्रणा वाऱ्यावर असल्याचे चित्र आहे. काही हुल्लडबाज पर्यटक धरणाच्या सांडव्याच्या कडेला धरण्याच्या सांडव्यातून गळती होत असलेल्या पाण्यात जाऊन डुबक्या घेताना दिसतात. गतवर्षी चांदोली धरणाची अतिरेकी संघटनेने रेकी केल्याचे समोर आले होते. तरीदेखील प्रशासनाला जाग आलेली नाही.

वॉटर स्पीड ब्रेकर टँकपासून पाठीमागे अंदाजे शंभर ते दीडशे मीटर लांब तसेच दोन्ही बाजूने अंदाजे दहा मीटर उंच असणारी भिंत ओलांडून धरणाच्या मुख्य भिंतीजवळ जाणे सहजासहजी शक्य नाही. तरीही पर्यटक असे जीवघेणे धाडस करीत असल्याने धरण प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे.

**चौकीत रक्षक नाही**

**मागील एक वर्षापासून धरणाच्या पायथ्याला दक्षिण बाजूस सुरक्षारक्षकांची चौकी बांधण्यात आली आहे. तिचा वापर येथे येणाऱ्या पर्यटकांवर लक्ष ठेवण्यासाठीच होऊ शकतो. शासनाने लाखो रुपयांचा निधी या चौकीसाठी खर्च केला आहे. परंतु अद्याप या चौकीत सुरक्षारक्षक नेमण्यात आलेला नाही.**

# महाबळेश्वर झालं थंडगार; उन्हाळ्यात गारव्याबरोबरच धुक्याची दुलई

**पर्यटक लुटतायत मनमुराद आनंद**

**सातारा :** सातारा जिल्ह्याला सलग पाच दिवस वळवाच्या पावसाने झोडपून काढले. दोन दिवसांपासून वळवाने पूर्ण विश्रांती घेतली असली तरी जिल्ह्यासह महाबळेश्वरचा पारा कमालीचा खालावला आहे. हवामान विभागाने मंगळवारी महाबळेश्वरचे कमाल तापमान २६.८ तर किमान १८.५ अंश सेल्सीअस इतके नोंदविले असून, पर्यटक या अल्हाददायक वातावरणाचा मनमुराद आनंद लुटत आहेत.

मे महिना सुरू होताच जिल्ह्यात उष्णतेची लाट पाय पसरू लागली. साताऱ्याचा पाराही ४१ अंशांवर पोहोचला. उन्हाच्या काहिलीने जो-तो हैराण झाला. अशा परिस्थितीत वळवाच्या पावसाने हजेरी लावली अन् नागरिकांसह शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळाला. दि. १९ ते २६ मे या कालावधीत जिल्ह्याला वळवाने जोरदार तडाखा दिला. वादळी वाऱ्यासह झालेल्या या पावसाने घरे तसेच शेतीपिकांचे अतोनात नुकसान झाले. दोन दिवसांपासून या पावसाने उसंत घेतली असली तरी तापमानाचा आलेख खालावल्याने सर्वदूर पसरलेली उष्णतेची लाटही आता ओसरली आहे.



थंड हवेचे ठिकाण असलेल्या महाबळेश्वरचा पारा यंदा ३५ अंशांवर गेला होता. मात्र, वळवाच्या पावसाने येथील तापमानही ३० अंशांच्या खाली आले आहे. सोमवारी येथील कमाल तापमान २२ तर मंगळवारी २६.८ अंशांवर घसरले. ऐन उन्हाळ्यात महाबळेश्वरात धुक्याची दुलई व थंडीची लाट पसरल्याने पर्यटकही सुखावले. सातारा शहराचे कमाल तापमान मंगळवारी ३४.७ अंश सेल्सीअस इतके नोंदविण्यात आले.

# ३९ होर्डिंगचा अहवाल सादर; तर आठ जणांना हवी मुदत

**सातारा :** सातारापालिकेने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील पाच व्यावसायिकांनी ३९ होर्डिंगचा स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल मंगळवारी पालिकेत सादर केला. तसेच आठ होर्डिंगधारकांनी अहवाल सादर करण्यासाठी आणखी पंधरा दिवसांची मुदत मागितली आहे. मात्र, पालिकेने बजावलेल्या नोटिसीचा कालावधी संपुष्टात आल्याने प्रशासनाने मुदतवाढ देण्यास असमर्थता दर्शवली असून, होर्डिंग हटविण्याची कारवाई सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.



सातारा शहरातील ४१ व्यावसायिकांकडून पालिकेची मालकी असलेल्या व खासगी इमारतींवर एकूण ३०० होर्डिंग उभारण्यात आले आहेत. घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेनंतर पालिका प्रशासनाने सर्व व्यावसायिकांना तातडीने नोटीस बजावून होर्डिंगचा स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल, होर्डिंग उभारण्यासाठी दिलेले परवानगी पत्र, होर्डिंगची जमिनीपासूनची उंची, रुंदी याची माहिती, होर्डिंग उभारण्यात आलेल्या मिळकतीचा उतारा, करारनामा, मिळकत व जाहिरात कर भरल्याची पावती आदी दस्तऐवज तीन दिवसांत पालिकेत सादर करण्याचे आदेश दिले होते.या आवाहनाला प्रतिसाद देते आतापर्यंत केवळ पाच होर्डिंगधारकांनी ३९ होर्डिंगचा स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल पालिकेत सादर केला. तर आठ जणांनी अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ मागितली आहे. परंतु नोटिसीचा कालावधी समाप्त झाला असून, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीदेखील नादुरुस्त व कमकुवत होर्डिंग तत्काळ काढून टाकून अनधिकृत होर्डिंग लावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिल्याने प्रशासन कारवाईवर ठाम आहे. सुरक्षेची सर्व साधने उपलब्ध होताच शहरातील अनधिकृत व धोकादायक होर्डिंग हटविले जातील, अशी माहिती अतिक्रमण निर्मूलन विभागाचे प्रमुख प्रशांत निकम यांनी दिली.

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील कोअर क्षेत्रातील गावांचे तात्काळ पुर्नवसन करावे

## सुशांत मोरे ; अन्यथा १० जूनपासून आमरण उपोषण करणार

**सातारा;** सह्याद्री व्याघ्र राखीव मधील कोअर क्षेत्रातील विविध गावांचे तात्काळ पुर्नवसन करावे तसेच वन्यजीवांचे संरक्षण करावे अन्यथा १० जूनपासून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव नागपूर यांना माहिती अधिकार, सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी निवेदनाव्दारे दिला आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्र्यांसह विविध विभागाचे सचिव, विविध जिल्ह्याचे अधिकारी, जिल्हाधिकारी सातारा, उपसंचालक (कोयना) सह्याद्री व्याघ्र प्रकल्प यांना देण्यात आल्या आहेत.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सह्याद्री वाचवा मोहीम अंतर्गत माहिती अधिकार कायद्याच्या अंतर्गत माहिती घेऊन असे दिसून आले आहे की, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी या चार जिल्ह्यात वसला आहे. व्याघ्र प्रकल्प हद्दीत काही अतिदुर्गम गावे, वाड्या-वस्त्या आहेत. याठिकाणी समक्ष भेट दिली असता संबंधित कोअर क्षेत्रात वसलेल्या काही गावांचे पुर्नवसन झाले आहे.

मात्र काही गावांचा गेल्या कित्येक वर्षांपासून पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे. यामध्ये मौजे देऊर, वेळे, ढेण, तळदेव, मायणी, खिरखंडी, मळे, कोळणे, पाथरपुंज तसेच खुंदलापूर (धनगरवस्ती) गोठणे व कुंडी या गावात लोकवस्ती वास्तव्यास आहे. या गावातील लोकांचे जीवन हे जंगलावर अवलंबून असते. ते वनौपज गोळा करण्यासाठी, घरे बांधण्याकरता लाकडे आणण्यासाठी, कोअर क्षेत्रातील घनदाट जंगलात जात असतात. दरम्यान त्यांच्याकडून वन पर्यावरण कायद्याचे उल्लंघन होऊन जैवविविधतेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

यावेळी संबंधित व्यक्तींवर जंगली श्वापदांचे अनेकवेळा हिंस्त्र हल्ले होत असतात, त्यामध्ये काहींना आपला जीव गमवावा लागतो. तसेच ही गावे कोयना अभयारण्याच्या गाभा क्षेत्रामध्ये येत असल्याने या गावांमध्ये कोणत्याही १८ नागरी सुविधा उपलब्ध होत नाहीत.

या गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहे. तो तात्काळ मार्गी लावावा. तसेच जल, जंगल, जमीन या संसाधानांचे संरक्षण करुन वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाचे जतन करण्यात यावे. वरील सर्व नमूद गावांची माहिती घेऊन पुनर्वसनाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासाठी उचित कारवाई ९ जून पर्यंत करावी अन्यथा १० जुनपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषण करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी सांगितले.